**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – विलास दिनकर शिंदे,

**वय** – ६४ वर्ष, **व्यवसाय** – दुकानदारी,

**राहणार.**– विक्रमनगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्री. एस. आय. सावंत, सरकारी वकील.**

**१.** मी २०१५ साली उचगांव येथील साई पेट्रोल पंपाजवळ फ्रेन्डस ट्रान्सपोर्ट चा येथे नावाने व्यवसाय करत होतो. मी सकाळी ८.०० वा. पासून सायंकाळी ७.०० वा. पर्यंत माझ्या पुतण्याच्या मदतीने व्यवसाय चालवत होतो. त्यावेळी माझ्या कार्यालयात लॅन्ड लाईन क्र. ०२३१–२६०५७०५ वापरात होता. त्यावेळी मी मोबाईल क्र. ९३७११२६६१८ वापरत होतो. माझा मोबाईल क्रमांक आज देखील वापरात आहे. मला ट्रान्सपोर्ट साठी माझ्या कार्यालयातील लॅन्ड लाईन व मोबाईल वरती फोन येत होते. मला भाडे ठरल्यानंतर कमिशन पोटी प्रत्येक गाडी मागे ४०० रुपये मिळत होते.

२. दि. २४.०९.२०१५ रोजी मला सायंकाळी ६.०० च्या दरम्यान माझ्या मोबाईल वरती ट्रक चालक आरोपीचा फोन आला होता. त्याने त्याचा के.ए. २३ ए १८४८ क्रमांकाचा ट्रक असून केरळला जाण्यासाठी माल असल्यास देण्याची विनंती केली होती. मला दि. २५.०८.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा. अनिल शुगर्स बेंगलोर येथील दलालाचा फोन आला होता. त्याने मला आजरा साखर कारखान्यातून २१ टन साखर केरळ येथे पोहचवायची असल्याचे सांगितले होते. त्याने मला त्याच्या मोबाईल वरून फोन केला होता. आज देखील अनिल शुगर्सचा मोबाईल चालू आहे.

३. मी अनिल शुगर्सच्या मागणी प्रमाणे त्यांना वाहतुकीसाठी आरोपीचा गाडी क्र. के.ए. २३ ए १८४८ एसएमएस ने कळविला होता. त्याप्रमाणे त्यांनी कारखान्याला यु.के. अबुबकर अन्ड कंपनी च्या नावाने २१ टन साखरेचा डी.ओ. पाठवला होता. त्याचे पैसे अबुबकर शुगर ने आजरा कारखान्याला दिले होते. त्या प्रमाणे आजरा कारखान्याने माल घेण्यासाठी गेलेल्या ट्रक मधून माल पाठवून दिला होता. तो माल कोठे उतरावयाचा याबाबत अनिल शुगर्सने सर्व माहिती देणे अपेक्षीत होते. आजरा कारखान्यातून साखर घेवून गेलेला ट्रक चार दिवस होवून

देखील केरळ येथे पोहचला नसल्यामुळे अनिल शुगर्स यांनी मला पुन्हा संपर्क केला होता. त्यामुळे मी आरोपीच्या मोबाईलवरती फोन केला असता तो बंद लागत होता. मला शंका आल्यामुळे मी आरोपीने दिलेला गाडी नंबर तपासण्यासाठी बेळगांव येथे गेलो होतो. त्यावेळी मला तो क्रमांक ट्रकचा नसून बोलेरो गाडीचा असल्याचे समजले होते. त्यामुळे मी आजरा पोलीसांकडे आरोपीविरोधात तक्रार दाखल केली होती. आता मला ती तक्रार दाखवली त्यावरती माझी स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. तिला **नि.क्र. १९** देण्यात येतो.

**४.** आमची ट्रान्सपोर्टची संघटना आहे. कारखान्यातून घेतलेली साखर पोहचलेली नसल्यामुळे अबुबकर कंपनी व आमच्या संघटनेमध्ये तडजोड झाली होती. त्यामध्ये आम्ही अबुबकर कंपनीला नुकसान भरपाई देण्याचे ठरले होते. अबुबकर कंपनीबाबतची संपूर्ण माहिती अनिल शुगर्स यांच्याकडून मिळू शकते. त्याबाबत मी अनिल शुगर्स कंपनीला फोन करून अबुबकर कंपनीबाबत माहिती मागितली असता ते कोणतीही माहिती दयायला तयार नाहीत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे उलटतपास – श्री. सचिन देसाई, वकील.</u>**

**५.** साक्षीदाराचा सरतपास सचिन देसाई वकीलाचे सहकारी वकील यांच्या उपस्थितीत नोंदवण्यात आलेला असून त्यांनी दिलेल्या अर्जावरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

**उलटतपास अपूर्ण**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ०४.०२.२०२६.
(आर. पी. थोरे)

आजरा.
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.